Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-IX SEPTEMBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# किशोरवयीन मुलांशी पालकांचा सुसंवाद – काळाची गरज

**रचना एम.सिरसाट,**
सहा. प्रा.
भारतीय महाविद्यालय, अमरावती

**सारांश :**

*पूर्वी एकत्र कुटूंबात संस्कार कळत न कळत व्हायचे. घरातल्या एकोप्यातून, प्रथा, परंपरातून वडील मंडळीचा धाक असायचा, त्यामुळे पालकत्वाच्या जबाबदारीची थोडी–थोडी वाटणी व्हायची व त्यामुळे जीवनाला शिस्त होती. बघता–बघता ही परिस्थिती बदलली. स्पर्धा वाढली, ताणतणाव निर्माण झाले. जीवनात यांत्रिकता, कृत्रिमता आली. त्यामुळे अनेक आव्हाने, समस्या निर्माण झाल्यात. मुलांसमोरील जग व्यापक झाले व किशोरवस्थेतील मुलांसमोर पालकांची भूमिका बदलत गेली. पालक–बालक सुसंवादासाठी वेळेची कमी जाणवायला लागली. मुलांच्या ईच्छा पूर्ण करण्यात पालक स्वतःचे कर्तव्य समजू लागले. व्यस्त पालक व किशोरावस्थेतील गोंधळलेली मुलांची भावनिकता यांचा समन्वय साधणे कठिण जाऊ लागले. त्यामुळे या मुलांच्या भविष्यावर, एकूण व्यक्तिमत्वावर परिणाम दिसून येऊन मुले चुकीच्या आदर्शाकडे, मार्गाकडे वळतांना दिसू लागले. या वयातील मुलांचा व पालकांचा सुसंवाद साधल्या गेल्यास मुलांमध्ये भावनिक सुरक्षितता, आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होईल. त्यामुळे पालकांनी आपले व्यस्त जीवन सांभाळून सुध्दा मुलांशी मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. त्यांचे मोबाईल, मित्रपरिवार याबद्दल जागरूक राहणे आवश्यक आहे.*

**प्रस्तावना :**

किशोरवयीन मुले कमालीची हळवी असतात. या नाजुक अवस्थेत पालकांच्या वागण्याचा त्यांच्यावर खुप परिणाम होत असतो हे लक्षात घेवून पालकांचा या मुलांशी होणारा संवाद महत्वाचा ठरतो. मुलांच्या वाढत्या वयानुसार पालकत्व वयोपरत्वे बदलत असते. आपलं मुलं कस असावं, त्याने कसे वागावे, काय मिळवावं, काय करावे, काय करु नये, याविषयी पालकांच्या काही अपेक्षा असल्या तरी, आपलं मुलं हे आपल्यापेक्षा वेगळ, स्वतंत्र अस्तित्व असलेली एक व्यक्ती आहे. मुलांना समजून घेणे तारेवरचो कसरत आहे.

अलीकडे सगळे कुटूंबिय एकत्र येतात, तेव्हाही जमलेल्या मंडळीबरोबर हवा तसा संवाद घडत नाही. इथेही आधुनिक तंत्रज्ञानामुळे आणि सोशल नेटवर्किंग साईटसचा वापर वाढल्यामुळे कुटूंबातल्या माणसांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. मुलांतल्या उर्मींना आणि पालकांमध्ये लपलेल्या मुलाला निर्भेळ आनंद अनुभवण्याचा अवसरच कमी मिळतोय.आईची कुटूंबातील भुमिका आता खुप महत्वाची होती आणि ती राहणारच आहे. परंतु आताच्या या सामाजिक बदलात कुटूंबातील जाणत्या पुरूषांची सर्वकष भूमिका ही महत्वाची आहे.नोकरी, करिअरमध्ये व्यस्त असणा–या स्त्रियांच्या आयुष्यात, आपण मुलांकडे पुरेसे लक्ष देत नाही.हा अपराधभाव स्त्रियांकडे येतोच.तसा तो पुरूषांमध्ये येत नाही. परंतु तरी सुध्दा स्त्रियांच्या जबाबदा–या, पुरूषांना मिळणारा कमी वेळ या सर्वांचा परिणाम म्हणजे मुले मागतील ते पालक द्यायला तयार होतात. परंतु मुलांना घडविण्यासाठी वेळ त्यांच्याकडे नसतो ही सत्य परिस्थिती आणि आधुनिकता यांच्या गुंतागुंतीमध्ये पालकांची पिढी अडकली. संभ्रमावस्थेतील ही पालकांची पिढी त्यातून गोंधळ वाढवत आहे.

आजच्या रेटरेसमध्ये अडकलेला पती, करीअर, घर यांच्या कचाट्याामध्ये सापडलेली स्त्री हा एक वर्ग, तर आधुनिक जगात वावरणारी मुलं आणि त्यांच्या तुलनेत त्यांच्या जगाची फारशो माहिती नसलेले त्यांचे पालक हा दुसरा वर्ग, यात आजच्या समाजातला मोठा भाग झगडतो आहे. हा समाज अस्वस्थ आहे, नैराश्याच्या घेरात आहे. म्हणूनच आजच्या कुटूंबातील पालकांनी अंतर्मुख होण्याची गरज आहे. दिवसातील बहुतांश काळ नोकरी–व्यवसायासाठी बाहेर असल्यामुळे पालकांचा मुलांबरोबरचा संवाद तुटत चालला आहे. मुठीतल्या मोबाईल मध्ये सगळी दुनिया सामावली जात असताना त्या वेगावर स्वार होणाऱ्या लहान वयात जे येऊ नये ते सगळं येऊन आदळत असताना त्याला सामोरे जाणाऱ्या आजच्या किशोरवयीन पिढीचं आजचं वास्तव काय आहे? पूर्वी एकत्र कुटूंबात संस्कार कळत नकळत व्हायचे. घरातल्या एकोप्यातून, प्रथापरंपरातून, एकमेकांच्या वागण्यातून वडील मंडळीचा धाक असायचा, घरी–दारी आदर्श पूरक, पोषक वातावरण, आजी–आजोबा, आत्या, काका, मामा या साऱ्यांमधून जणू पालकत्वाच्या जबाबदारींची थोडी–थोडी वाटणी व्हायची, घराला घरपण, विचारांना मुरड, आचारांना मर्यादा होती, जीवनाला शिस्त होती, कौटूंबिक बालबोध वळणं होती, धाक होता, बघता–बघता ही परिस्थिती बदलली. उद्योगधंदे, कारखाने वैज्ञानिक प्रगती यामुळे जीवनाला वेग आला. एकीकडे ज्ञानाचा विस्फोट, तर दुसरीकडे भोवळ यावी अशो युगपरिवर्तन स्पर्धा निर्माण झाली जीवनात यांत्रिकता, कृतीमता आली. कुटूब पद्धती झपाट्याााने बदलत चालली, प्रश्न वाढले, समस्या गुंतागुतीच्या झाल्यात.पूर्वी मुलांना पालकाचा धाक होता. आता पालकांना मुलांना धाक, प्रसार–प्रचार माध्यमातून मुलांपर्यंत नको ते पोहचले. आज काही मुलांचे आई–वडील आहेत पण बऱ्याच मुलांना पालक नाहीत. **पा**लन करणारा, **ल**क्ष ठेवणारा, **क**र्तव्यदक्ष (पालक) असा पालकवर्ग दुर्मिळ होऊ लागला. नोकरी, व्यवसाय, ताणतणाव, धावपळ यात गुरफटून गेल्यानं पालक पिचलेला, खंतावलेला, धास्तावलेला जाणवायला लागला. यात मुलांसमोरील जग व्यापक झाले. अनेक आव्हाने, समस्या निर्माण झाल्यात. त्यामुळे पालक संपर्काची, सुसंवादाची गरज नव्याने निर्माण झाली हा मुद्दा लक्षात घेऊन विषयाची निवड करण्यात आली.

**उद्दिष्ट्ये** : –

1) किशोरावस्था समजून घेणे
2) पालकांची भूमिका समजणे
3) पालक–बालक सुसंवाद महत्व जाणणे

किशोरावस्था ही अशो अवस्था आहे की, मुलमूली धड लहान नसतात आणि मोठेही नसतात. साधारण 12 ते 19 वर्ष वय या गटात समाविष्ट होते. टॅरनच्या मते, "12 ते 16 वर्षाच्या मुलांची अवस्था म्हणजे किशोरावस्था" शब्दकोषानुसार किशोरावस्था म्हणजे बालपण आणि तारूण्य यामधील काळ. बालपण संपून तारूण्यात प्रवेश मिळण्याचा काळखंड. उत्साह, जोम कल्पकता, नाविण्याची ओढ, धडाडी या वयातील गुणवैशिष्ट्य. किशोरावस्थेत हारमोन्सच्या प्रभावामुळे विभिन्न शारीरिक, मानसिक व भावनात्मक बदल झपाट्याााने होतात. या वयात तो प्रचंड आत्मविश्वास व असुरक्षा व भावनांच्या चक्रात असतो. अशा वेळेस पालकांशो सुसंवाद त्यांना योग्य मार्गदर्शन देण्यास मदत करतो. मुल 16 वर्षाचे झाले की, त्यांना मित्राप्रमाणे वागवावे. त्यांना सांगण्याची पद्वत बदलावी लागते. दृष्टीकोण बदलावा लागतो. हारमोन्स बदलामुळे त्यांच्यामध्ये अस्थिरता निर्माण होऊन योग्य व अयोग्य याचा पुरेसा समज त्यांना नसतो. धडाडीचे निर्णय घेणे, चंचलता, स्वत:ची प्रतिमा तयार करणे, मित्रपरिवारात जास्त रमणे, विरुध्द लिंगी आकर्षण, बदलत्या शरीर रचनेबद्दल उत्सुकता, आत्मवर्चस्व, नाटकीपणा, विसंगत वर्तन, मनोभावाची लवचिकता अशो किशोरावस्थेची खास वैशिष्ट्य ग्रॅन्हिल स्ओनली यांनी नमुद केली. यासारख्या अनेक बदलांसोबत किशोरावस्था विकसित होत असते. मुलांचं जस–जस वय वाढतं तस–तस शारिरिक व मानसिक अवस्थेत परिवर्तन होत असतात. किशारावस्थेत मुले बरेचदा मुडी होतात. हळूहळू त्यांचे विश्व बदलायला लागते. बाहेरच्या जगाशी येणारा संबंध त्याला नवनवीत गोष्टीत रस घ्यायला लावतो. मित्रपरिवाराचा व इतर

व्यक्तिंचा त्याच्या मनावर परिणाम होतो. स्वत: एक वेगळ व्यक्तिमत्व आहोत, याची जाणींव होऊ लागते. या काळात चुकीचा आदर्श, पालकांचे असहकार्य मुलांचं भवितव्य बिघडण्यास कारणीभूत ठरते.

दुसरीकडे या वयातील मुलांचे भविष्य घडविण्याकरीता आज पालकांची जी जीवघेणी मेहनत आहे, त्यामध्ये पालक स्वत: गोंधळलेले आहेत. त्यांना त्यांचाच निश्चित विचार माहित नसतो. द्विधा मनस्थितीत असलेला पालक मुलांना घडविण्यात सतत चुकत असतो. एखाद्या नामांकित शाळेत प्रवेश मिळवला की, आपली नैतिक जबाबदारी संपली, ट्यूशन क्लासेस लावले की, पालकत्वाची इतिकर्तव्य. मुलांना केवळ शिक्षण संधी उपलब्ध करून देणे म्हणजे संपल, अस नसुन ते शिकत असतांना जागरूक राहणे, चौकशी करणे, गरजेनुसार मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ज्यावेळी या अवस्थेतील तणावग्रस्त मुले ताणवग्रस्त पालकांसमोर उभे राहतात, त्यावेळी अघोशोत युद्धजन्यस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. अशावेळी पालकांनी मुलांची भावना व परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. पालकांनी स्वतःच्या भावनांचे नियमन करणे व मुलांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरं शोधून देण्यास मदत करणे यासाठी तारेवरची कसरत करावी लागते.

पालकांनी मुलाच्या वर्तणुकीवरून, शारीरिक हालचालीवरून काही प्रश्न विचारून त्यांची मानसिकता ओळखणे व त्यांना भावनिक पाठींबा देणे आवश्यक आहे. घरातील विसंवादाला मुलं मित्रामध्ये उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतात.

आज जगण्याची गती इतकी वाढली आहे की, आपल्या स्वतःकडे देखील पाहायला वेळ नाही. त्यातुनच पालक–पाल्यातील, आई–बाबामधील संवाद तुटतो आहे. डॉ.हरिश शेट्टी सांगतात की, हे तुटणे गंभर आजारपेक्षाही गंभीर आहे. म्हणून पालकांनी मुलांशी संवाद साधताना वेगवेगळे आयुध वापरण्याची गरज आहे. सध्याच्या परिस्थितीत पालकांनाही मुलांना द्यायला वेळ नसतो. त्याची भरपाई विविध खेळ, वस्तु, आवडीच्या गोष्टी देऊन केली जाते. या प्रसंगी प्रत्येक गोष्टीला हो म्हणणारे पालक मुलांच्या मानसिकतेला चुकीच्या मार्गाकडे घेऊन जातात.

मुलांसमोरील जग व्यापक आहे. अनेक आव्हाने, समस्या निर्माण झाल्यात. त्यामुळे पालक संपर्काची, सुसंवादाची, सहकार्याची गरज नव्याने निर्माण झाली. त्यासाठी संस्कार शिबीरे निर्माण झालीत. पालक आणि मुले यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत चालली. पालकांना मुलांसाठी वेळी कमी पडायला लागला. स्वतःचे स्टेट्स, मुलांच्या सुविधा, विविध क्लासेस जोपासण्यास पालकांचा वेळ जातो आणि आता आपले व्हॉअस्ॲप. या काळात चुकीचा आदर्श, पालकांचे असहकार्य, मुलांचे भवितव्य बिघडण्यास कारणीभूत ठरतो. पालकांच्या अवास्तव अपेक्षा मुलांमध्ये न्युनगंड निर्माण करू शकतो किंवा मुलांचा बेडर, उद्धट बनवू शकतो. मुलांचे भविष्य घडविण्याकरीता आज पालकांनी जी जीवघेणी मेहनत आहे त्यामध्ये पालक स्वत: गोंधळलेले आहेत. द्विधा मनस्थितीत असलेला पालक मुलांना घडविण्यात सतत चुकत असतो. एकदा नामांकित शाळेत प्रवेश मिळाला की, आपली जबाबदारी संपली. ट्यूशन क्लासेस लावले की पालकांचे कर्तव्य संपले. आज कुटूंबात वडीलांचा दर्जा मेहनत करून योग्य व अयोग्य मार्गाने पैसा मिळविणे व मुलांनी मागीतलेली प्रत्येक गोष्ट घेऊन देणे, रविवार मित्रमंडळीत घालविणे व मुलांकडून खूप अपेक्षा करणे. अपेक्षांची परिपूर्ती न झाल्यास त्याला अपमानास्पद वागणुक देणे ही आजच्या कुटूंबातील शोकांतिक आहे. यामुळे मुलांमध्ये न्युनगंड निर्माण होतो. हीच बालक–पालक यामधील संवादाच्या अपयशाची पहिली पायरी होय. यानंतरच्या अवस्थेत मुले एकतर भितीग्रस्त किंवा बिनधास्त, बेडर होताना दिसतात. आज विविध माध्यमातून मुलांना नको त्या वयात नको त्या गोष्टी माहिती होतात. आई–वडीलही मुलांसमोर नको त्या गोष्टी, चर्चा, वाद करतात. त्यांच्यामध्येही तडजोडीचा अभाव असतो त्याचे विपरित परिणाम मुलांवर होऊन मुलं टोकाची भूमिका स्विकारतात.

पालक–बालक सुसंवादमध्ये प्रेमाजी गरज, सुरक्षिततेची गरज, मान्यतेची गरज महत्वाची आहे. मुलांचे विश्व म्हणजे त्यांचे घर आणि ज्यांच्या उबेखाली मुले सुरक्षित वाढत असतात असे दोन महत्वाचे आधारस्तंभ म्हणजे आई–वडील. पालकांनी पालकत्व स्विकारतांना मुलांना शारीरिक, मानसिक, बौद्दिक रित्या

स्विकार करून त्यांना योग्य आकार देणे, त्यांची सर्वांगीण जडणघडण विकसित करणे आवश्यक आहे. त्यांची योग्यता, क्षमता, त्यांची स्वप्न लक्षात घेऊन त्यांना योग्य दिशा देणे गरजेच आहे.

कौतुक, प्रेमाची थाप, मित्रत्वाची जपवणुक, आदर्श मार्गदशक होऊन त्यांना जोपासल्यास त्यांच्या व्यक्तित्व विकासाला मजबुती येईल व त्यासाठी आजच्या काळात सर्व पालकांना प्रशिक्षणाची गरज आहे. आजच्या परिस्थितीवर नव्या काळानुसार उपाय सुचवताना डॉ. हरिष शेट्टी सांगतात की, लॅपटॉप, कॉम्प्युटर, मोबाईल या सर्वाचा वापर हॉलमध्येच करण्यावर कटाक्ष असावा, रात्री झोपण्यापुर्वी सर्व मोबाईल एकत्र असावेत, सर्व व्यवहार मुलांना माहित असावेत. प्रत्येक सणामध्ये पालकांनी मुलांबरोबर असावे.

- पी. शर्मन (1987) यांनी पालक–बालक संबंधाने अध्ययन केले. त्यावरून असा निष्कर्ष काढला की, पालकांनी निर्माण केलेल्या शांतातपूर्ण वातावरणाने बालकांच्या बाढीच्या क्षमतेला चालना मिळते.
- हेन्सी बीलन यांच्या अध्ययनानुसार जी मुले आपल्या वडिलांबरोबर वेळ घालवतात ती मुले अधिक आत्मविश्वास दाखवतात व इतर मुलांबरोबर सहकार्यांने वागतात
- Nationl Survey of Children Health (2003) यांच्या सर्व्हेक्षणानुसार सहा ते सतरा वयोगटातील पालकांजवळ राहणारी 87 मुले पालक यांच्याशी चांगल्या प्रकारची जवळीक दशवतात. 13 पालक साधारण, तर 1 पालक जवळीक दर्शवित नाही.
- 23 पालक आपल्या कल्पना मुलांबरोबर शेअर करतात. त्यांच्या पालक–बालक संबंध चांगले परिणाम दर्शवितो.
- अमेरिका मेडिकल असोशिएशनच्या रिपोर्ट नुसार जी पालक मुलांकडून जास्त अपेक्षा ठेवतात. त्यांच्या मुलांमध्ये भावनिक अस्थिरता, न्युनगंड निर्देशित होतो.
- इप्सॉस (2011) यांच्या रिपोर्ट नुसार 80 भारतीय पालक म्हणतात, दिवसेंदिवस मुलांसाठी वेळ काढणे अवघड जाते आणि वेळ मिळतो, एकत्र येतो तेव्हा आधुनिक तंत्रज्ञान, सोशल नेटवर्किंग साइट्सचा अतिरेकी वापरामुळे मुलांमध्ये दुरावा निर्माण होतो.

पालक मुलांचा सुसंवाद साधण्याकरीता पुढील बाबी प्रकर्षाने उपयोगात आणाव्यात असे डॉ.लता फाटदरे यांचे मत आहे. पालकांनी मुलांशो बोलताना त्यांच्या एखाद्या न पटलेल्या गोष्टीवर टिका करताना खुप संयम बाळगायला हवात्र आपल प्रेम, कळकळ मुलांना पटेल, समजेच अशा पद्वतीने चूक त्यांना समजावून सांगायला हवी, तसेच मुलांच्या मताचा आदर, मुलांच्या मित्राबददल जागरूकता असणे महत्वाचे.

मुलांना टोचून बोलणे, तूलना करणे, अपमानित करणे, नकारात्मक भूमिका घेणे, अपेक्षा अतिसंरक्षण टाळणे हितकारक, आपली मुलं आपली संपत्ती असतात त्यामुळे पालक मुले यांच्यातील सुसंवाद चांगला असल्यास मुलांचा व्यक्तिमत्व विकास चांगला होण्यास पाया रचला जातो. त्याकरीता मुलांमध्ये अपयश पचविण्याचे सामर्थ्यही निर्माण करता आले पाहीजे. आई–वडीलांचा एकमेकांशो मुलांसमोर वाद होणे मुलांच्या विकासाला बाधा निर्माण करणारे ठरते. आई–वडीलांनी प्रथम एकमेकांचा आदर ठेवणे गरजेचे आहे.

स्वस्थ व आनंदी घरासाठी मुलांचा पालकांशो सुसंवाद महत्वाचा ठरतो. त्याकरीता कुटूंबाशी प्रत्येकाशो बांधिलकी, एकमेकांना वेळ देणे, अहंकार आड येऊ न देणे, आदर राखला जाणं, आवश्यक शिस्त, सकारात्मक दृष्टीकोन या सर्व बाबींचा पालकांनी विचार करणे हितावह ठरते. आजच्या युगात कोणत्याही गोष्टीसाठी पालकांनी 'नाही' हा शब्द उच्चारणे मुलांना मान्य करणे कठिण जाते. त्या अनुषंगाने मुलांमध्ये अनेक प्रकारचे न्युनगंड, अविचार बघायला मिळतात. त्याकरीता मुलांना परिस्थितीची जाणीव करून ती स्वीकारण्याची मानसिकता पालकांनी शिकविणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :–**

अध्ययनावरून एकंदर असा निष्कर्ष निघतो की, आजच्या काळाात जगण्याची गती इतकी वाढली की, स्वतःकडे देखील पाहायला आपल्याला वेळ नाही. यातुनच पालक–पाल्यातील, आई–वडीलातील संवाद तुटतो आहे. मुलांसमोरील जग व्यापक झाले. अनेक आव्हाने, समस्या निर्माण झाल्यात, पालकांना मुलांसाठी वेळ कमी पडायला लागला. पालकांचे असकार्य मुलांचे भविष्य बिघडण्यास कारणीभूत ठरू लागले. यावर उपाय म्हणजे पालक–पाल्य यामधील सुसंवाद अनेक शास्त्रानी सिध्द केले की, पालक–पाल्य यामधील सुसंवाद मुलांचे व्यक्तिमत्व विकसित करण्यात महत्वाचे काम करते. त्याकरीता आज पालकांना प्रशिक्षणाची गरज आहे.

त्यामुळे मुलांसमोर योग्य आदश निर्माण होऊन चांगले व वाईट यातील भेद ओळखण्याचे सामर्थ्य निर्माण करते.

**संदर्भ सूची :**

1) डॉ. गिनॉट हेम, जी (अनुवाद–भालचंद्र मराठे) 'पालक–बालक सुसंवाद' डिसेंबर 2006, अरविंद घनश्याम पाटकर, मनोविकास प्रकाशन, शक्ती टॉवर, 672, नारायण पेठ, पुणे – 411030.
2) खासनिस शुभांगी, काळे केतकी 'हे वयच वेड असतं' 2009 सुनिता मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे–30
3) डॉ. शिंदे वाय. के., पालक संजीवनी' जाने.2006, प.पू.गगनगिरी सेवा भावी संस्था, देवल कॉम्प्लेक्स, विश्रामबाग, सांगली.
4) 'लोकसत्ता' 'चतुरंग' 'पुरवणी' 'सारे काही पालकांच्या हाती' 12 ऑक्टो.2013
5) लोकप्रभा' 'गांगारलेलो मुले आणि गोंधळलेले पालक' 21 नोव्हेंबर 2014, के सागर हाऊस ऑफ बुक्स, अप्पा बळवंत चौक, पुणे.
6) सकाळ सप्ताहिक, 8 जुलै 2017, सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेडचे प्रकाशन, 2 ऑक्टोंबर 1987 अंक 39.
7) Conference valume on 'Parent Child Relationship', July 28, 2012, Vishwa Publisher Distributor Mahal, Nagpur
8) Tawna Bandy B.S. 'Parent Child Relationship', Kristin Anderson More- Family Strenth, From Internet